# महाराष्ट्र शासन,
# वित्त विभाग
# सहसंचालक, लेखा व कोषागारे कार्यालय, अमरावती
# "लेखा कोष" भवन, विदयापीठ रोड, अमरावती

**दुरध्वनी क्रमांक- ०७२१ - २६६८११७**

**ई-मेल : jd.amravati@mahakosh.in / jdadmin-amravati@mah.gov.in**


क्रमांक : सहसंलेवको/सरळसेवा भरती/क.ले/०१/२०२४/ दिनांक :-२६.०१.२०२५

## जाहिरात

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग अधिसूचना क्रमांक सेवाप्र-२०२३/प्र.क्र.०६/कोषा (प्रशा-३),दिनांक ०९/०९/२०२४ नुसार संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील कनिष्ठ लेखापाल संवर्गाचे सेवाप्रवेश नियम विहित करण्यात आलेले आहेत. सदर सेवाप्रवेश नियमानुसार कनिष्ठ लेखापाल या प्रादेशिक संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे आहेत. त्यानुषंगाने अध्यक्ष, प्रादेशिक निवड समिती अमरावती विभाग तथा सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग यांचेकडून आवश्यक पात्रता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभागांतर्गत सहसंचालक कार्यालय अमरावती, कोषागार कार्यालय अमरावती, अकोला, वाशीम, यवतमाळ, व बुलडाणा येथील कनिष्ठ लेखापाल गट-क संवर्गातील सरळसेवेने भरतीसाठी ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज **https://mahakosh.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर मागविण्यात येत आहेत. टपालाद्वारे/हस्तबटवड्याने अथवा कुरिअरने पाठविलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

२.सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात **https://mahakosh.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी जाहिरातीत नमूद संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचून ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेसंबंधित आवश्यक अद्यावत माहिती प्राप्त करून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

### सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती
### कनिष्ठ लेखापाल परीक्षा २०२४

| अ.क्र | पदाचे नाव | वेतनश्रेणी | एकुण भरावयाची पदे |
|---|---|---|---|
| **१** | **कनिष्ठ लेखापाल** | **७ व्या वेतन आयोगानुसार S-१० (२९२००-९२३००)** | **४५** |

३. प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज खालील वेळापत्रकानुसार मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज नोंदणी सुरु दिनांक | दि.२९.०१.२०२५ रोजी १७.०० वाजल्यापासून |
| २ | ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि २८.०२.२०२५ रोजी २३.५९ पर्यंत |
| ३ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दि.२८.०२.२०२५ रोजी २३.५९ पर्यंत |
| ४ | परीक्षेचा दिनांक व कालावधी | **https://mahakosh.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच उमेदवारांना प्रवेशपत्राद्वारे कळविण्यात येईल. |

४. कनिष्ठ लेखापाल संवर्गातील रिक्त पदांचा सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय तपशील खालीलप्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

<table>
<tr><th rowspan="2">अ.क्र.</th><th rowspan="2">प्रवर्ग</th><th colspan="9">समांतर आरक्षण</th></tr>
<tr><th>सर्वसाधारण</th><th>महिला</th><th>प्राविण्य प्राप्त खेळाडू</th><th>माजी सैनिक</th><th>अनाथ</th><th>दिव्यांग</th><th>पदवीधर अंशकालीन कर्मचारी</th><th>भूकंपग्रस्त</th><th>प्रकल्पग्रस्त</th></tr>
<tr><td>१</td><td>अनुसूचित जाती</td><td>०</td><td>२</td><td>०</td><td>१</td><td rowspan="11">०१</td><td rowspan="11">१ पद दिव्यांग अंध/अल्पदृष्टी<br>व<br>१ पद कर्णबधिर अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता</td><td>१</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>२</td><td>अनुसूचित जमाती</td><td>२</td><td>१</td><td>०</td><td>१</td><td>०</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>३</td><td>विमुक्त जाती (अ)</td><td>१</td><td>१</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>४</td><td>भटक्या जमाती (ब)</td><td>१</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>५</td><td>भटक्या जमाती (क)</td><td>१</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>६</td><td>भटक्या जमाती (ड)</td><td>१</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>७</td><td>इतर मागास प्रवर्ग</td><td>२</td><td>२</td><td>१</td><td>१</td><td>१</td><td>०</td><td>१</td></tr>
<tr><td>८</td><td>विशेष मागास प्रवर्ग</td><td>१</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>९</td><td>आर्थिक दृष्टया दुर्बल घटक</td><td>२</td><td>२</td><td>०</td><td>१</td><td>१</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>१०</td><td>सामाजिक व शैक्षणिक मागास वर्ग</td><td>१</td><td>२</td><td>१</td><td>१</td><td>१</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>११</td><td>अराखीव</td><td>३</td><td>१</td><td>१</td><td>३</td><td>१</td><td>१</td><td>१</td></tr>
</table>

* **अनाथ आरक्षण- महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ**-2022/**प्र.क्र.**122/**का**-03, **दिनांक** 06.04.2023 **अन्वये प्राप्त निर्देशानुसार** , 45 **पदांपैकी संस्थात्मक प्रवर्गाकरीता** 01 **पद आरक्षित होत आहे.**

* **दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकुण पदसंख्येपैकी आहेत. दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदांवर शिफारस करतांना उमेदवार कोणत्या प्रवर्गातील आहे याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.**

* **वर दर्शविलेल्या रिक्त पदांच्या प्रवर्गनिहाय/समांतर आरक्षणनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार प्रादेशिक निवड समिती तथा सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग अमरावती यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम राहिल.**

**५. <u>ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी मागदर्शक सूचना.</u>**

५.१ उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात **https://mahakosh.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर जाऊन सविस्तर अभ्यासावी.

५.२ उमेदवारास अर्ज सादर करण्याकरीता ऑनलाईन लिंक तसेच काही समस्या उद्‌भवल्यास हेल्पलाईन क्रमांक **https://mahakoh.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

५.३ अर्जात हेतूपूरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन, परीक्षेचे वेळी नक्कल (copy) करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेनंतरही गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अपात्र ठरविणे इत्यादी यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमांचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार अध्यक्ष, प्रादेशिक निवड समिती तथा सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग यांना राहतील. तसेच विहित केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणुक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल. तसेच निवड झाल्यानंतर देखील सेवा समाप्तीस पात्र ठरेल.

५.४ वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक (एस.एस.सी) परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येईल.

५.५ शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजण्यात येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविण्यात येईल.

५.६ गुणांऐवजी श्रेणी पद्धत असल्यास कागदपत्र पडताळणीचे वेळी उमेदवारांनी गुणपत्रकासोबत श्रेणीची (Grade) यादी सादर करावी.

५.७ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.

१. प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.

२. अर्ज सादरीकरण

३. परीक्षा शुल्क भरणा

**५.८ प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे -**

५.८.१ **https://mahakosh.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर वापरकर्त्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरीता "नवीन वापरकर्त्यांची नोंदणी" **("Click here for New Registration")** वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल. नवीन खाते (वापरकर्त्याचे नाव **Login** व **Password**) निर्माण करण्यासाठी लॉग-इन पृष्ठाद्वारे विचारलेली सर्व माहिती भरून नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.

५.८.२ प्रोफाईलद्वारे माहिती भरताना उमेदवाराने स्वतःचाच वैध ई-मेल आयडी, वैध भ्रमणध्वनी क्रमांक व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.

५.८.३ उमेदवारांकडे नित्य वापरात असेल असा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरतीप्रक्रियेदरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ई-मेल व भ्रमणध्वनीद्वारे देण्यात येणार असल्या कारणामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध/ कार्यरत राहणे आवश्यक आहे.

५.८.४ वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वतःच्या **Login व Password** द्वारे प्रवेश करून प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशील, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता इत्यादी संदर्भातील तपशीलाची अचूक नोंद करावी.

**५.९ परीक्षा केंद्र**

५.९.१ सदर परीक्षा संपूर्ण राज्यभरात निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येईल. याकरिता उमेदवारांना ३ परीक्षा केंद्रांची निवड करणे आवश्यक आहे. उमेदवारांने निवडलेल्या ३ परीक्षा केंद्रांपैकी तीनही केंद्रांची क्षमता संपुष्टात आल्यास इतर उपलब्ध कोणत्याही केंद्रामध्ये परीक्षा घेण्यात येईल व याबाबतचे स्थळ प्रवेशपत्रावर (हॉल तिकीट) नमूद करण्यात येईल.

५.९.२ परीक्षा केंद्र, परीक्षेचे ठिकाण, दिनांक, वेळ व सत्र इत्यादी बाबत बदलाची विनंती मान्य केली जाणार नाही.

५.९.३ उमेदवारांनी आपल्या जबाबदारीवर स्वखर्चाने परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावयाचे आहे या संबंधात कोणत्याही प्रकारच्या हानी / नुकसानीस सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग जबाबदार राहणार नाही.

**५.१० छायाचित्र/ फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे :-**

५.१०.१ **छायाचित्र / फोटो :** एका पांढऱ्या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करू नये अथवा फोटो साक्षांकित करू नये. वरील सुचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करू नये. फक्त स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करावा.

**स्वाक्षरी :** विहित आकार/ क्षमतेप्रमाणे काळ्या शाईच्या बॉलपेनने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी. उमेदवाराने स्वत: स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राह्य धरण्यात येणार नाही.

५.१०.२ वरीलप्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.

५.१०.३ छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड (Upload of Photo / Signature) करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे -

(i) छायाचित्र प्रतिमा (रुंदी 3.5 cm x उंची ४.५ cm)

(ii) फोटो/छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परीक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे. छायाचित्र रंगीत (कलर फोटो) व पासपोर्ट आकाराचे असणे आवश्यक आहे. हलक्या रंगाच्या, शक्यतो पांढऱ्या, पार्श्वभूमीच्या विरुद्ध घेतलेले असावे. टोपी आणि गडद चष्मा स्वीकाहार्य नाहीत.

(iii) छायाचित्राचे परिमाण १४० x १८० पिक्सेल असावे.

(iv) छायाचित्राचा आकार ८० kb ते २०० kb दरम्यान असावा. स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार - २०० kb पेक्षा जास्त नसावा.

(v) अर्जदाराला काळ्या शाईचा बॉलपेनने पांढऱ्या कागदावर सही करावी लागेल.

- परिमाण १४० x १८० पिक्सेल असावे.
- फाईलचा आकार ८० kb ते २०० kb दरम्यान असावा. स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार २०० kb पेक्षा जास्त नसावा.

५.१०.४ ऑनलाईन अर्जामध्ये छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी प्रतिमा स्पष्ट आहेत आणि योग्यरित्या अपलोड केल्या आहेत हे तपासावे. फोटो आणि स्वाक्षरी स्कॅनिंग आणि अपलोड करण्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार उमेदवाराने फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची कार्यवाही करावी.

५.१०.५ स्कॅन करून अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र / हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्या वेळी, प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल तसेच, आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**५.११ अर्ज सादरीकरण -**

५.११.१ उमेदवारांनी अर्ज करणेसाठी https://mahakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जावे.

५.११.२ उमेदवारांनी ऑनलाईन अर्जातील तपशील काळजीपूर्वक भरावेत आणि त्याची पडताळणी करावी.

५.११.३ उमेदवाराचे नाव किंवा त्याचे /तिचे वडील/ पती इ. चे नाव अर्जामध्ये बरोबर लिहिलेले असावे, जसे ते प्रमाणपत्र / गुणपत्रिका / ओळख पुराव्यामध्ये दिसते. यामध्ये कोणताही बदल/ तफावत आढळल्यास सदर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

**५.१२ विहीत कागदपत्रे / प्रमाणपत्रे अपलोड करणे :**

५.१२.१ कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करण्याची प्रक्रिया :-

| अ.क्र. | प्रमाणपत्र/कागदपत्र | फाईल फॉरमॅट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (MB) |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता. | PDF | १०० | २ |
| २ | वयाचा पुरावा. | PDF | १०० | २ |
| ३ | जन्माचा पुरावा | PDF | १०० | २ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा. | PDF | १०० | २ |
| ५ | टंकलेखन प्रमाणपत्र | PDF | १०० | २ |
| ६ | MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र | PDF | १०० | २ |
| ७ | राखीव प्रवर्गातील उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र | PDF | १०० | २ |
| ८ | आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक असल्याचा पुरावा. | PDF | १०० | २ |
| ९ | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र. | PDF | १०० | २ |
| १० | माजी सैनिक / दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा. | PDF | १०० | २ |
| ११ | खेळाडू / अनाथ / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त /अंशकालीन पदवीधर यापैकी आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा. | PDF | १०० | २ |
| १२ | विवाहीत स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा. | PDF | १०० | २ |
| १३ | महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र | PDF | १०० | २ |
| १४ | महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला | PDF | १०० | २ |
| १५ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा. | PDF | १०० | २ |
| १६ | लहान कुटंबाचे प्रमाणपत्र. | PDF | १०० | २ |
| १७ | आत्महत्याग्रस्त शेतक-याचे पाल्य असल्याचा पुरावा | PDF | १०० | २ |
| १८ | अ) स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य<br>ब) १९९१ चे जनगणना कर्मचारी<br>क) १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी | PDF<br>PDF<br>PDF | १०० | २ |

*** उमेदवाराने वरील प्रमाणे त्यांना लागू असणारी कागदपत्रे अपलोड करावीत.**

### ५.१३ परीक्षा शुल्क भरणा:-

### ५.१३.१ परीक्षा शुल्क

(i) सदर भरती प्रक्रियेत खालील प्रमाणे परीक्षा शुल्क आकारले जाणार असून सदर परीक्षा शुल्क ना परतावा (Non-Refundable) राहील.

| अ.क्र. | पदाचे नाव | परीक्षा शुल्क | |
|---|---|---|---|
| | | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
| १ | कनिष्ठ लेखापाल | रु. १०००/- | रु. ९००/- |

(ii) उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

(iii) माजी सैनिक यांचेसाठी परीक्षा शुल्क माफ राहील.

(iv) उमेदवारांनी ई-पावती आणि फी तपशील असलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंटआऊट घेणे आवश्यक आहे.

(v) परीक्षा शुल्क भरल्याबाबतची ई-पावतीची प्रत ही ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जाच्या प्रतीसोबत कागदपत्रांच्या तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

### ५.१३.२ परीक्षा शुल्काचा भरणा :-

(i) परीक्षा शुल्काचा भरणा प्रणालीव्दारे उपलब्ध करुन दिलेल्या पेमेंट गेटवेच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेट बँकिगव्दारे परीक्षा शुल्क अदा करता येईल.

(ii) अर्ज भरण्याची व परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम तारीख संगणकामार्फत निश्चित केली असल्याने पेमेंट गेटवे दिलेल्या तारखेला व वेळेला बंद होणार आहे. त्यामुळे परीक्षार्थी उमेदवारांनी मुदतीतच अर्ज व परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.

(iii) परीक्षा शुल्काचा भरणा करतांना बँक खात्यामधून परीक्षा शुल्काच्या रकमेची वजावट झाल्यावर परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला (Payment Successful) असल्याचा संदेश विभागाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या पृष्ठावर प्रदर्शित झाल्याशिवाय व परीक्षा शुल्काची पावती तयार झाल्याशिवाय संकेत स्थळावरील संबंधित पृष्ठावरुन आणि /अथवा खात्यातून लॉग आऊट होऊ नये.

(iv) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरण यशस्वी झाला आहे किंवा कसे, याची स्थिती (Status) लगेचच अवगत होईल. खात्यातून (Logout) होण्यापूर्वी परीक्षा शुल्क यशस्वीपणे भरले असल्याबाबत व बँकेकडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

(v) परीक्षा शुल्काचा भरणा अयशस्वी ठरल्यास ऑनलाईन पद्धतीने पुन्हा शुल्क भरण्याची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने विहीत दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास या संदर्भातील कोणत्याही तक्रारीची विभागाकडून दखल घेतली जाणार नाही व परीक्षा शुल्क भरणा करु न शकलेल्या उमेदवाराचा संबंधित भरती प्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही.

(vi) ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रणालीद्वारे तयार केलेल्या ऑनलाइन अर्जाची प्रिंटआउट घ्यावी.

**५.१३.३ अर्ज सादरीकरण**

अर्ज **https://mahakosh.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक २९.०१.२०२५ पासून भरणेसाठी उपलब्ध होतील.

**६. सर्वसाधारण सूचना :-**

६.१ अर्ज मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करून देण्यात आला असला, तरी संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. संक्षिप्तपणे (Abbreviations) वा अद्याक्षरे (Initials) न देता संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या/पत्त्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.

६.२ एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रांवरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदला संदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

६.३ पत्रव्यवहारासाठी स्वत:चा पत्ता लिहावा. व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र/ वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा / संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देवू नये.

६.४ अर्जामध्ये केलेला दावा व कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर केलेल्या सारांश पत्रातील अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती अनधिकृत समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करू न शकल्यास / न मिळाल्यास उमेदवाराची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

६.५ संबंधित पदाच्या / परीक्षेच्या जाहिरातीमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करूनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल.

६.६. उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करू इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी.

६.७ उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर / उपस्थिती पत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरीलप्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

६.८ अर्ज सादर केलेल्या उमेदवारांस प्राथमिक छाननीच्या आधारे परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल. त्यामुळे उमेदवार परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण

झाल्यामुळे उमेदवारांस निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

६.९ भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्याअनुषंगाने होणाऱ्या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ **https://mahakosh.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध होईल, याव्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाद्वारे भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६.१० वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग / नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग, महिला, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन कर्मचारी, खेळाडू, अनुभव, पात्रता इत्यादी संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे / निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

६.११ ज्या उमेदवारांना यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय / समाज कल्याण / आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/ जिल्हा सैनिक बोर्ड/ अपंग कल्याण कार्यालय इ. कार्यालयात नोंदविलेले आहे अशा उमेदवारांनी देखील स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील.

## ७. परीक्षेचे स्वरुप व दर्जा :-

| अ.क्र. | विषय | प्रश्नांचा दर्जा | प्रश्नांची संख्या | प्रतिप्रश्न गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा | २५ | २ | ५० |
| २ | इंग्रजी | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा | २५ | २ | ५० |
| ३ | सामान्य ज्ञान | पदवी | २५ | २ | ५० |
| ४ | बौध्दिक चाचणी | पदवी | २५ | २ | ५० |
| | एकुण | | १०० | २ | २०० |

७.१ **परीक्षा कालावधी २ तास (१२० मिनिटे) असेल.**

परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरु होणाच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी दोन तास (१२० मिनिटे) असली तरी उमेदवारास ओळख पटविणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, सूचना देणे या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी साधारण १ तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे लागेल.

७.२ जाहिरातीत नमूद केलेल्या पदासाठी एकूण २०० गुणांची ऑनलाईन परीक्षा घेण्यात येईल.

७.३ प्रश्नपत्रिकेतील प्रश्न बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरुपाचे असतील. मराठी विषयाची परीक्षा मराठी भाषेतून व इंग्रजी विषयाची परीक्षा इंग्रजी भाषेतून घेण्यात येईल. सामान्यज्ञान व अंकगणित या विषयाची परीक्षा मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषेतून घेण्यात येईल.

७.४ कनिष्ठ लेखापाल पदासाठी एकच परीक्षा घेण्यात येईल. या परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु त्यापैकी मराठी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) दर्जाच्या समान राहील.

७.५ ऑनलाईन प्राप्त प्रवेशपत्राची पीडीएफची प्रत (हॉलटिकीट) निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जपून ठेवण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. उमेदवाराकडून प्रवेशपत्र हरविल्यास / गहाळ झाल्यास पुन्हा देण्यात येणार नाही. तसेच परीक्षा झाल्यावर पीडीएफ कॉपी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

७.६ कनिष्ठ लेखापाल पदासाठी उमेदवारांची निवड करताना मौखिक परीक्षा (मुलाखती) घेण्यात येणार नाही. ऑनलाईन परीक्षेच्या गुणांच्या आधारे निवड यादी तयार करण्यात येईल.

७.७ ऑनलाईन परीक्षेत समान गुण असल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/ प्र.क्र.५४/ का.१३-अ, दिनांक ०४/०५/२०२२ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीन्वये कार्यवाही करण्यात येईल.

७.८ उमेदवाराने परीक्षेच्या एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

७.९ ऑनलाईन परीक्षेदरम्यान काही समस्या आकस्मिकपणे उद्‌भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा समस्यांमुळे परीक्षा घेण्याबाबत किंवा निकाल घोषित करण्याबाबत काही अडचण उद्‌भवल्यास अशा अडचणी तात्काळ सोडवण्याची सर्वतोपरी प्रयत्न केले जातील व आवश्यकता भासल्यास नव्याने परीक्षा घेण्यात येईल. या संदर्भात अध्यक्ष, प्रादेशिक निवड समिती तथा सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग यांचा निर्णय अंतिम राहील. अशा प्रकारचा बदल न स्विकारणाऱ्या उमेदवारांस त्याची उमेदवारी गमवावी लागेल.

७.१० ही परीक्षा Computer Based Test पद्धतीने घेण्यात येणार असून प्रत्येक सत्राच्या प्रश्नपत्रिका स्वतंत्रपणे उपलब्ध केल्या जाणार असून आवश्यकतेनुसार एकापेक्षा जास्त सत्रात परीक्षा आयोजित करण्यात येणार आहे. सत्र १ ते अंतिम सत्र यामध्ये प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व त्याची काठिण्यता तपासण्यात येवून त्यांचे समानीकरण करण्याचे (Normalization) पद्धतीने गुणांकन निश्चित करून निकाल जाहिर करण्यात येईल. सदर Normalization सर्व परिक्षार्थी यांना बंधनकारक राहील, याची सर्व परिक्षार्थी यांनी नोंद घ्यावी.

## ८. अभ्यासक्रम :-

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १ | **मराठी** :- सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे |
| २ | **इंग्रजी :-** Common Vocabulary, Sentence structure, Grammar, Use of idoms and Phrases and their meaning and comprehension of passage. |
| ३ | **सामान्यज्ञान** :-<br>**१) भारतीय संघ राज्य व्यवस्था, भारतीय राज्यघटना, स्थानिक स्वराज्य संस्था, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ व विधीमंडळ इत्यादी.**<br>घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावने मागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे/ ठळक वैशिष्ट्ये केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणांची मार्गदर्शक तत्वे- शिक्षण, युनिफॉर्म सिव्हिल कोड, स्वतंत्र न्यायपालिका, राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ कर्तव्ये, अधिकार व कार्य, राज्य विधीमंडळ,विधानसभा, विधान परीषद व त्यांचे सदस्य, अधिकार, कार्य व कर्तव्ये, विविध समित्या इत्यादी.<br>**२) आधुनिक भारताचा विशेषतः महाराष्ट्राचा इतिहास -**<br>सामाजिक व आर्थिक जागृती (१८८५-१९४७) महत्वाच्या व्यक्तीचे कार्य, समाज सुधारकांचे कार्य, स्वातंत्र्यपुर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमान पत्रे, शिक्षणाचा परीणाम, स्वातंत्र्य पुर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी.<br>**३) भारताचा व महाराष्ट्राचा भूगोल-**<br>महाराष्ट्राचा व भारताचा प्राकृतिक (Physical) भूगोल, मुख्य प्राकृतिक (Physiographic) विभाग, हवामान शास्त्र (Climate) पर्जन्यमान व तापमान, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत, पठार, विविध भूरुपे, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती, वने व खनिजे,मानवी व सामाजिक भूगोल, लोकसंख्या, लोकसंख्येचे स्थानांतर (Migration of Population) व त्याचे उगम (Source) आणि इष्ट स्थानावरील (Destination) परीणाम,<br>ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्या व त्यांचे प्रश्न<br>**४) पर्यावरण-**<br>मानवी विकास व पर्यावरण, पर्यावरण पूरक विकास, नैसर्गिक साधन संपत्तीचे संधारण विशेषतः वनसंधारण, विविध प्रकारचे प्रदूषणे व पर्यावरणीय आपत्ती, पर्यावरण संवर्धनात कार्यरत असलेल्या राज्य / राष्ट्र / जागतिक पातळीवरील संघटना / संस्था इत्यादी<br>**५) सामान्य विज्ञान व तंत्रज्ञान** |

| | |
|---|---|
| | अ) भौतिकशास्त्र (Physics) ब) रसायनशास्त्र (Chemistry) क) प्राणिशास्त्र (Zoology) ड) वनस्पतीशास्त्र (Botany) इ) दुरसंवेदन, हवाई व ड्रोन छायाचित्रण, भौगोलिक माहिती प्रणाली व त्याचे उपाययोजन (Remote Sensing, Aerial & drone Photography, Geographic information system (GIS) and Its application etc) फ) माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (Information & Communiction Tecnology)<br>**६) अर्थव्यवस्था व नियोजन, विकास विषयक अर्थशास्त्र**<br>१. समग्रलक्षी अर्थशास्त्र<br>१.१ समग्रलक्षी अर्थशास्त्र १.२. वृध्दी आणि विकास १.३.सार्वजनिक वित्त १.४.आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आंतरराष्ट्रीय भांडवल.<br>२. भारतीय अर्थव्यवस्था<br>२.१ भारतीय अर्थव्यवस्था,भारतीय अर्थव्यवस्थेची आव्हाने व आर्थिक सुधारणा.<br>२.२ भारतीय शेती व ग्रामिण विकास २.३ सहकार २.४ मौद्रिक व वित्तीय क्षेत्र २.५ सार्वजनिक वित्त आणि वित्तीय संस्था २.६ उद्योग व सेवाक्षेत्र २.७ पायाभूत सुविधा विकास २.८ आंतरराष्ट्रीय व्यापार आणि भांडवल २.९ महाराष्ट्राची अर्थव्यवस्था<br>**७) चालू घडामोडी**<br>जागतिक तसेच महाराष्ट्रासह भारतातील<br>**८) माहिती अधिकार अधिनियम २००५ (As updated)** |
| ४ | **बुध्दिमापन चाचणी**<br>१) सामान्य बुध्दिमापन व आकलन<br>उमेदवार किती लवकर अचूकपणे विचार करु शकतो हे आजमावण्यासाठीचे प्रश्न<br>२) अंकगणित व सांख्यिकी<br>बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, दशांश, अपूर्णांक, टक्केवारी इत्यादी |

**९ पात्रता :-**

९.१ भारतीय नागरिकत्व

९.२ मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक

**१०. अधिवास :-**

१०.१ कनिष्ठ लेखापाल या पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Certificate of Age, Nationality and Domicile) सादर करणे आवश्यक राहील.

१०.२ कनिष्ठ लेखापाल पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी महसुल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०, दिनांक २७ जून २०११ नुसार ज्या परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही. सदर परीक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परीक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. तथापि सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परीक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही. ज्या उमेदवारांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला नसेल परंतू महाराष्ट्र राज्यातील रहिवास सलग १५ वर्षे व त्यापेक्षा अधिक कालावधीचा आहे. अशा परीक्षार्थी/उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

१०.३ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मकसी १००७/प्र.क.३६/का.३६, दि. १०.०७.२००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक उमेदवारांना वरील पदासाठी अर्ज करता येईल. सदर उमेदवारांनी ८६५ गावांतील १५ वर्षाचे वास्तव्य असलेले रहिवासी असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील. सदर उमेदवारांना सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गापैकी कोणत्याही प्रवर्गाचा लाभ अनुज्ञेय ठरत नाही.

**११. वयोमर्यादा :-**

११.१ ऑनलाईन अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास म्हणजेच दिनांक २८.०२.२०२५ रोजी किमान वयोमर्यादा १९ वर्षे व कमाल वयोमर्यादा खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | आरक्षण | कमाल वयोमर्यादा (वर्षे) |
|---|---|---|
| १ | अमागास | ३८ वर्षे |
| २ | मागासवर्गीय / आर्थिक दुर्बल घटक / अनाथ | ४३ वर्षे |
| ३ | दिव्यांग | ४५ वर्षे |
| ४ | (शासन निर्णय सा.प्र.वि. दि.१६.०४.१९८१ व दि.२०.०८.२०१० नुसार) माजी सैनिक | अमागास प्रवर्गातील माजी सैनिक ३८ वर्षे + सशस्त्र दलात केलेली सेवा + ३ वर्षे<br>मागास प्रवर्गातील माजी सैनिक ४३ वर्षे + सशस्त्र दलात केलेली सेवा + ३ वर्षे |
| ५ | (शासन निर्णय सा.प्र.वि. दि.२०.०८.२०१०) माजी सैनिक (दिव्यांग) | ४५ वर्षे |
| ६ | प्राविण्य प्राप्त खेळाडू | ४३ वर्षे |
| ७ | प्रकल्पग्रस्त | ४५ वर्षे |
| ८ | भूकंपग्रस्त | ४५ वर्षे |
| ९ | पदवीधर अंशकालीन कर्मचारी | ५५ वर्षे |
| १० | शासन निर्णय सा.प्र.वि. दि.०६.१०.२०१०अन्वये<br>अ) स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य<br>ब) १९९१ चे जनगणना कर्मचारी<br>क) १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी | ४५ वर्षे |

११.२ विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**१२. शैक्षणिक अर्हता :-**

वित्त विभाग, शासन अधिसूचना क्रमांक सेवाप्र-2023/प्र.क्र.06/कोषा (प्रशा-3), दि. 9.09.2024 नुसार "**कनिष्ठ लेखापाल**", गट-क (सेवाप्रवेश) नियम, 2024 विहित करण्यात आले असून नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीकरीता खालील अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

१२.१ **अ.** ज्यांनी पदवी धारण केली आहे; (पदवी याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता )

ब. तांत्रिक अर्हता - ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले आहे.

१२.२ शैक्षणिक व तांत्रिक अर्हता गणना करण्याचा दिनांक -

प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक व तांत्रिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

**१३. संगणक अर्हता :-**

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण - २०००/ प्र.क्र.६१/ २००१/ ३९, दिनांक १९/०३/२००३ मधील तरतूदीनुसार D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर A स्तर किंवा B किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उतीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **किंवा**
महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **किंवा** माहिती तंत्रज्ञान (साप्रवि) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंस-२०१२ /

प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४/०२/२०१३, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान), शासन शुद्धीपत्रक क्रमांक मातंसं २०१२/प्र.क्र २७७/३९, दिनांक ३१/०३/२०१७,सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान), शासन पुरकपत्र क्रमांक मातंसं २०१२/ प्र.क्र.२७७/३९ दिनांक ०८/०१/२०१८ व सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान), शासन निर्णय क्रमांक मातंसं २०१२/ प्र.क्र.२७७/३९, दिनांक १६/०७/२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार संगणक अर्हता आवश्यक आहे.

तथापि वित्त विभाग, शासन अधिसूचना क्रमांक सेवाप्र-२०२३/प्र.क्र.०६/कोषा (प्रशा-३), दिनांक ०९/०९/२०२४ नुसार नियुक्तीपूर्वी संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण केलेले नसल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण २०००/ प्र.क्र.६१/ २००१/ ३९, दिनांक १९/०३/२००३ मधील तरतूदीनुसार संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत धारण करणे आवश्यक राहील.

## १४. प्रवेशपत्र :-

१४.१ परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवाराचे प्रवेशपत्र विभागाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावर **(https://mahakosh.maharashtra.gov.in)** उमेदवाराच्या प्रोफाईलव्दारे परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येईल. प्रवेशपत्र परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी डाऊनलोड केलेले मूळ प्रवेशपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१४.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वतःचे प्रवेशपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१४.३ संकेतस्थळावर प्रवेशपत्र उपलब्ध करुन देण्यात आल्यानंतर त्याबाबत उमेदवाराला त्याच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर लघुसंदेशाव्दारे **(SMS व्दारे)** कळविण्यात येईल. याबाबतची घोषणा **https://mahakosh.maharashtra.gov.in** संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर प्रसिध्द करण्यात येईल.

१४.४ परीक्षेच्या दिनांकापूर्वी ३ दिवस अगोदर प्रवेशपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती कार्यालयाकडे संपर्क साधावा.

१४.५ परीक्षेच्या वेळी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड, किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक / उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे उमेदवाराची ओळख पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही, सदर उमेदवाराचे मूळ प्रवेशपत्र व ओळखपत्राची एक छायाप्रत परीक्षा हॉलमध्ये जमा करणे आवश्यक राहील.

१४.६ नावामध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहीत स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

## १५. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-

१५.१ आरक्षणामध्ये बदल झाल्यास त्याबाबतची घोषणा/सूचना वेळोवेळी परीक्षेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा व सुचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

१५.२ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतर परिवर्तनिय असून आरक्षित पदांसाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

१५.३ एखादी जात / जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे अर्ज करतांनाच उपलब्ध असेल तर संबंधित जात / जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

१५.४ समांतर आरक्षणाबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही १०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६/०३/१९९९, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३/०८/२०१४ तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९/१२/२०१८ व सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक राआधो ४०२४/प्र.क.१४/१६ -अ, दिनांक २५/०१/२०२४ आणि तद्नंतर राज्यात शासन सरळसेवा पदभरती मध्ये समांतर आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१५.५ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (ई.डब्ल्यू.एस.) उमेदवारांकरीता सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२/०२/२०१९ व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. ३१/०५/२०२१ अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

१५.६ विधी व न्याय विभागाची अधिसूचना सन २०२४ चा अधिनियम क्रमांक १६ दिनांक २६/०२/२०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गासाठी राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय व निम शासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये व शैक्षणिक संस्थामधील प्रवेशासाठी १० टक्के आरक्षण विहीत करण्यात आलेले आहे. या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग प्रवर्गासाठी आरक्षण राहील. विधी व न्याय विभागाची अधिसूचना सन २०२४ चा अधिनियम क्रमांक १६ दिनांक २६/०२/२०२४, व सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक बीसीसी -२०२४/प्र.क्र.७५/ आरक्षण- ५ दिनांक २८/०६/२०२४ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४ अनुषंगाने द्यावयाचे जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमेलियर प्रमाणपत्र देण्याबाबत प्रदान करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनूसार सुधारीत परिशिष्ट अ व परिशिष्ट ब मध्ये प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१५.७ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी-२०१२/प्र.क्र.१८२/ विजाभज-१, दिनांक २५/०३/२०१३ अन्वये विहित कार्यपध्दतीनूसार तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मावक, दिनांक ०९/०३/२०२३ नुसार विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी एखाद्या पदाकरिता अर्ज दाखल करावयाची / स्विकारण्याची अंतिम तारीख किंवा त्या पदाकरिता निश्चित करण्यात आलेली विशिष्ट निर्णायक तारीख ज्या वित्तीय वर्षात येते त्या वित्तीय वर्षातील उमेदवाराचे नॉनक्रिमीलेयर प्रमाणपत्र गृहित धरण्यात येईल.

१५.८ सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवाराचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१५.९ अराखीव (खुला) उमेदवाराकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषा संदर्भातील अटींची पुर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारासह) अराखीव (खुला) सर्व साधारण पदावरील शिफारशी करीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी अर्जामध्ये त्याच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

१५.१० कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे. तोच अर्थ असेल.

१५.११ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतीचा दावा करणाऱ्या उमेदवाराकडे संबंधित कायदा/ नियम/आदेशानुसार प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्विकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे विहित नमुन्यातील वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

१५.१२ सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

**१६. महिला आरक्षण :-**

१६.१ महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवास **(Domicile)** असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे.

१६.२ विविध सामाजिक प्रवर्ग, महिला, प्राविण्य प्राप्त खेळाडू, अनाथ इत्यादीसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानूसार राहील.

१६.३ महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक महिआ २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४/०५/२०२३ नूसार खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांना नॉन -क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन -क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१६.४ महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३०/का-२, दिनांक १०/०४/२०१७ नूसार ३० टक्के महिला आरक्षणाच्या संदर्भात महिला उमेदवारांनी सादर केलेले नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास विभागा यांचेकडून तपासणी करुन घेण्यात येईल व तद्‌नंतरच पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

१६.५ महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक ८२ /२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५/०५/२००१ नूसार भरतीच्या वर्षात त्यात्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पात्र पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येईल.

**१७. खेळाडू आरक्षण :-**

१७.१ राज्यातील प्राविण्य प्राप्त खेळाडूंना शासकीय निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५ टक्के आरक्षण लागू करण्याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक राक्रीधो -२००२/ प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ०१/०७/२०१६, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन शुध्दीपत्रक, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८/०८/२०१६शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १७१७ / प्र.क्र.३९/ क्रीयुसे-२, दिनांक २७/०३/२०१७, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो-२००२/ प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १०/१०/२०१७, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो-२००२/ प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १५/११/२०१७, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक खेआक्ष-१७१९ / प्र.क्र.९६/ क्रीयुसे-२, दिनांक १२/०३/२०२१, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १७१६/ प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३०/०६/२०२२, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक खेआक्ष-१७१९/ प्र.क्र.१७६/ क्रीयुसे-२, दिनांक २०/०६/२०२४ आणि तद्‌नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील व इतर सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

१७.२ प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे

प्राविण्य प्रमाणपत्र परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पुर्वीचे असणे बंधनकारक आहे.

१७.३ खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक, कार्यालयाकडे सदर परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

१७.४ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १७१६/ प्र.क्र.१८/ क्रीयुसे-२, दिनांक ३०/०६/२०२२ नुसार एकापेक्षा जास्त खेळांची राज्य/ राष्ट्रीय स्पर्धांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळाची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरिता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. संबंधित पदाच्या भरतीसाठी सादर केलेल्या अर्जात, खेळाडूने जे प्रमाणपत्र/ प्रमाणपत्रे उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांना पडताळणीसाठी सादर केली असल्याचे नमूद केले असेल केवळ त्याच प्रमाणपत्रांच्या पात्रतेचा अहवाल नियुक्तीच्या पुढील प्रयोजनार्थ गृहीत धरला जाईल. या तरतुदीखेरीज अन्य खेळातील आणि परीक्षेच्या अन्य कोणत्याही टप्प्यावर सादर करण्यात येणारे खेळाडू प्रमाणपत्र पडताळणी अहवाल कोणत्याही परिस्थितीत ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

१७.५ सदर परीक्षेकरीता अर्ज सादर करतांना खेळाडू उमेदवारांनी विहीत अर्हता धारण करीत असले बाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्याचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असले बाबत, तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडी करीता पात्र ठरतो, या विषयीचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणी बाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवाराचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारस / नियुक्ती करीता विचार करण्यात येईल.

१७.६ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र. ६८/क्रीयुसे-२, दिनांक १८/०८/२०१६ नुसार भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील खेळाडू उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील बिगर खेळाडू उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.

१७.७ सदर आरक्षणाकरिता नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

१७.८ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १७१६/प्र.क्र. १८/ क्रीयुसे-२, दिनांक ३०/०६/२०२२ अन्वये खेळाडू प्रवर्गातून शिफारस केलेल्या उमेदवारांची क्रीडा प्रमाणपत्रे पुनर्पडताळणीसाठी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे पाठवण्यात येतील. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांनी वैध खेळाडू प्रमाणपत्र पडताळणी अहवाल दिल्याशिवाय संबंधीत उमेदवारास शासन सेवेत नियुक्ती दिली जाणार नाही.

१७.९ खेळाडू प्रवर्गातून अर्ज करताना खेळाडूने उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणी करून मिळण्याबाबत केलेल्या अर्जाची पोच पावती अथवा खेळाडूस उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून प्राप्त झालेला क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल जोडणे बंधनकारक आहे. अर्जासोबत उपरोक्त तपशील सादर न करणाऱ्या उमेदवारांचा खेळाडू संवर्गातून विचार होणार नाही.

**१८. दिव्यांग आरक्षण :-**

१८.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या आधारे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/ प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९/०५/२०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तीच्या संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

१८.२ प्रस्तुत परिक्षेमधून भरण्यात येणाऱ्या पदांकरिता दिव्यांग सुनिश्चिती संदर्भातील वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक सेवाप्र-२०१९/प्र.क्र.८१/कोषा प्रशा-३, दिनांक ११/०२/२०२१, वित्त विभाग, शासन

शुद्धीपत्रक क्रमांक सेवाप्र-२०१९/प्र.क्र.८१/कोषा प्रशा-३, दिनांक ०४/०३/२०२२ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदी लागू राहतील.

**कनिष्ठ लेखापाल पदाकरीता सुनिश्चित दिव्यांगत्व**

| अ.क्र | पदनाम | शासन निर्णय | शारीरिक पात्रता | दिव्यांग प्रवर्गासाठी पदे सुनिश्चिती |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लेखापाल | वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक सेवाप्र-२०१९/ प्र.क्र.८१/कोषा प्रशा-३, दि.११.०२.२०२१<br>वित्त विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक सेवाप्र-२०१९/प्र.क्र.८१/कोषा प्रशा-३, दि.०४.०३.२०२२ | S, ST, BN, MF, RW, SE, H, C. | a) LV, B<br>b) D, HH<br>c) OA, BA, OL, BL, OAL, CP, LC, Dw, AAV<br>d) ASD, SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |

Functional Requirement Abbreviations:

| Sr. No. | Abbreviations | Long From | Sr. No. | Abbreviations | Long From |
|---|---|---|---|---|---|
| 1 | S | Sitting | 5 | RW | Reading & Writing |
| 2 | ST | Standing | 6 | SE | Seeing |
| 3 | BN | Bending | 7 | H | Hearing |
| 4 | MF | Manipulation By Fingers | 8 | C | Communication |

Category Abbreviations:

| Sr. No. | Abbreviations | Long From | Sr. No. | Abbreviations | Long From |
|---|---|---|---|---|---|
| 1 | LV | Low Vision | 10 | CP | Cerebal Palsy |
| 2 | B | Blind | 11 | LC | Leprosy Cured |
| 3 | D | Deaf | 12 | Dw | Dwarfism |
| 4 | HH | Hard of Hearing | 13 | AAV | Acid Attack Victims |
| 5 | OA | One arm | 14 | ASD | Autism Spectrum Disorder |
| 6 | BA | Both arm | 15 | SLD | Specific Learning Desability |
| 7 | OL | One Leg | 16 | MI | Mentel Illness |
| 8 | BL | Both Leg | 17 | MD | Multiple Disabilities |
| 9 | OAL | One arm And One Leg | | | |

१८.३ दिव्यांग व्यक्तीसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

१८.४ दिव्यांग व्यक्तीची संबंधित संवर्ग/ पदांकरिता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/ परिपत्रके/आदेशानूसार राहील.

१८.५ दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदांवर शिफारस करतांना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे. याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्याची शिफारस करण्यात येईल.

१८.६ संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार / व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

१८.७ लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतीच्या दाव्यास पात्र असतील :-

१) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती.

२) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी सवलती.

१८.८ दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणताही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६ दिनांक १४/०९/२०१८ मधील आदेशानूसार केंद्र शासनाच्या **www.swavlambancard.gov.in** अथवा SADM या संगणकीय प्रणालीव्दारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**१९. दिव्यांग उमेदवार- लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत :-**

१९.१ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक दिव्यांग २०१९/प्र.क्र.२००/दि.क.२, दिनांक ०५.१०.२०२१ अन्वये विहित केल्यानुसार लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या परिक्षार्थी यांना स्पर्धा परीक्षेस बसताना लेखनाची अडचण तसेच लेखनाची गती कमी असल्यास त्यांनी केलेल्या मागणीनुसार दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम २ (आर) नुसार लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तीच्या वर्गवारीमधील अंधत्व/शारीरीक दिव्यांगत्व (दोन्ही हात बाधित असलेले किंवा दोन्ही हात नसलेले) असलेल्या दिव्यांग परिक्षार्थींना लेखनिक नियुक्त करण्यास परवानगी देण्यात येईल.

१९.२ लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या इतर प्रकारातील दिव्यांग परिक्षार्थींच्या बाबतीत, संबंधित दिव्यांग व्यक्तीने लेखनिक पुरविणे आवश्यक असल्याचे शासकीय रुग्णालयातील मुख्य वैद्यकीय अधिकरी/जिल्हा शल्य चिकित्सक/वैद्यकीय अधिकारी यांनी प्रमाणित केलेले विहीत नमुन्यातील (नमुना-१) प्रमाणपत्र भरुन संकेतस्थळावर अपलोड केलेनंतर सदर दिव्यांग परिक्षार्थीस गरज व आवश्यकतेनुसार परीक्षा देताना लेखनिक नियुक्त करण्यास परवानगी देण्यात येईल.

१९.३ उमेदवाराने स्वत: लेखनिकाची व त्याच्या मानधनाची व्यवस्था करावी. संबंधीत लेखनिकाच्या परीक्षा केंद्रावरील उपस्थितीबाबतची जबाबदारी उमेदवाराची राहील. लेखनिक उपस्थित नसल्याच्या कारणास्तव ऐनवेळी लेखनीकाची व्यवस्था सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग अमरावती कार्यालयामार्फत कोणत्याही परिस्थितीत केली जाणार नाही.

१९.४ लेखनिक म्हणून मदत देणारी व्यक्ती एकाच परिक्षेसाठी एकापेक्षा जास्त उमेदवारांना लेखनिक म्हणून काम करणार नाही याची दक्षता उमेदवाराने घ्यावी.

१९.५ उमेदवाराने स्वत: व्यवस्था केलेल्या लेखनिकाच्या गैरवर्तनाची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. लेखनिक व उमेदवार यांच्यामधील संभाषणामुळे परीक्षेची शांतता कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही अथवा इतर उमेदवारांची एकाग्रता भंग होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

१९.६ लेखनिकाने स्वत: प्रश्न सोडवू नये अथवा उमेदवारास कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन वा सूचना करु नयेत. उमेदवाराकडून तोडी सूचविण्यात येणारे उत्तर लेखनिकाने नमूद करणे एवढेच आवश्यक राहील.

१९.७ अर्जाद्वारे मागणी केली नसल्यास तसेच आवश्यक कागदपत्रे अपलोड न केल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही.

१९.८ परीक्षेकरीता लेखनिकाची मदतीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी **https://mahakosh.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

१९.९ लेखनिकाची मागणी करण्यात आलेल्या दिव्यांग उमेदवारांनी खालील मुळ प्रती तपासणीसाठी सादर करणे अनिवार्य आहे.

(१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. अप्रकि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य -६, दि. ०६.१०.२०१२ अथवा शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. अप्रकि-२०१८/सोआर ४६/आरोग्य-६, दिनांक १४.०९.२०१८ नुसार संगणक प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले विहित नमुन्यातील व कायमस्वरुपातील किमान ४० % दिव्यांगत्व असलेबाबतचे मूळ प्रमाणपत्र व त्याची स्वसाक्षांकित प्रत.

(२) दिव्यांगत्वामुळे उमेदवार स्वत: उत्तरे लिहीण्यासाठी सक्षम नसल्याबाबत विहीत प्राधिका-याने प्रमाणित केलेले मुळ प्रमाणपत्र (नमुना-१) (Certificate regarding physical Limitation in an examinee to write) व त्याची स्वसाक्षांकित प्रत. लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तीच्या वर्गवारीमधील अंधत्व/शारीरीक दिव्यांगत्व (दोन्ही हात बाधित असलेले किंवा दोन्ही हात नसलेले) असलेल्या दिव्यांग उमेदवार स्वत: लेखनिकाची व्यवस्था करणार असल्याने लेखनिकाची शैक्षणिक अर्हतेपेक्षा एक टप्पा कमी असणे आवश्यक आहे. त्याकरीता उमेदवाराने विहीत नमुन्यामध्ये वचनपत्र (Letter of undertaking for using own Scribe in PDF format) (नमुना-2) भरुन अपलोड करणे बंधनकारक आहे. (फक्त लेखनिकाची आवश्यकता असणा-या उमेदवारांकरीता लागू)

(3) लेखनिकाची मदत घेणा-या उमेदवाराने लेखनिकासह द्यावयाचे विहीत नमुन्यातील (नमुना -3) संयुक्त प्रमाणपत्र (लेखनिकाच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोसह) (फक्त लेखनिकाची आवश्यकता असणा-या उमेदवारांकरीता लागू)

(4)लेखनिकाने मूळ आधारकार्ड/पॅनकार्ड/स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हींग लायसन्स/मतदान ओळखपत्र/पासपोर्ट यापैकी एक (ओळखपत्र पडताळणीसाठी) व त्याची स्वसाक्षांकित प्रत. (फक्त लेखनिकाची आवश्यकता असणा-या उमेदवारांकरीता लागू)

19.10 लेखनिकाची मदत घेण्याबाबत विहीत निकषांचा उमेदवारांकडून पूर्तता होत नसल्याचे अथवा उमेदवाराने स्वत:बद्दल तसेच लेखनिकाबद्दल दिलेली माहिती चुकीची/खोटी असल्याचे अथवा उमेदवारांकडून अथवा लेखनिकांकडून कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास, संबंधित उमेदवाराची उमदेवारी रद्द करुन उमेदवारास व लेखनिकास स्वेच्छाधिकारानुसार सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग अमरावती मार्फत आयोजित केल्या जाणा-या परीक्षांमधून प्रतिरोधित (Debar) करण्यात येईल अथवा इतरही कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. अशा प्रकरणी उमदेवाराची शासन सेवेतील नियुक्ती झाली असेल तर त्याची सेवा समाप्ती करण्यास तो पात्र राहील.

19.11 अनुग्रह कालावधी - लेखनिक वापरण्यास परवानगी देण्यात आलेल्या लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींना देण्यात येणारा भरपाई वेळ हा प्रती तास 20 मिनटे असेल.

**२०. अनाथ आरक्षण :-**

२०.१ महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अनाथ - २०२२/ प्र.क्र. १२२ / का-०३, दिनांक ०६/०४/२०२३ मध्ये अनाथ आरक्षण धोरणांमध्ये भरती विषयक तरतूदी विहित केल्यानूसार अनाथांसाठी संस्थात्मक व संस्थाबाह्य अशी दोन प्रकारचे आरक्षण लागू राहतील. सदर आरक्षणाची अंमलबजावणी करण्याकरीता शासन निर्णयातील अनाथ आरक्षण पात्रतेसंदर्भातील निकष, आरक्षणाचे स्वरुप, अटी, शर्ती व आरक्षणातील अंमलबजावणी संदर्भातील मार्गदर्शक सूचनांनूसार कार्यवाही करण्यात येईल.

२०.२ महिला व बालविकास विभाग, शासन पूरकपत्र क्रमांक अनाथ-२०२२/ प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक १०/०५/२०२३ अन्वये एखाद्या भरती प्रक्रियेमध्ये अनाथ आरक्षणाच्या माध्यमातून अनाथांच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनूसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाहीत तर त्या भरती प्रक्रियेमध्ये ती पदे अनाथांच्या दुसऱ्या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनूसार भरण्यात येतील.

२०.३ परीक्षा अर्जाव्दारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अनाथ - २०२२/ प्र.क्र. १२२ / का-०३, दिनांक ०६/०४/२०२३ अन्वये विहीत करण्यात

आलेल्या कार्यपध्दतीनूसार विहीत नमून्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र अर्ज करतेवेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

२०.४ महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अनाथ २०२२/ प्र.क्र. १२२/का-०३, दिनांक ०६/०४/२०२३ मध्ये अनाथांसाठी आरक्षित पदांवर गुणवत्तेनूसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

२०.५ महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अनाथ २०२२/ प्र.क्र. १२२/का-०३, दिनांक ०६/०४/२०२३ अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजू होणाऱ्या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती पश्चात ६ महिन्याच्या कालावधीत आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचेकडून अनाथ प्रमाणपत्राची पडताळणी करून घेण्यात येईल.

**२१. माजी सैनिक आरक्षण :-**

२१.१ सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक आरटीए १०७९/४८२/१६ अ, दिनांक १६/०४/१९८१ अन्वये माजी सैनिक उमेदवारांना समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे.

२१.२ उमेदवार स्वतः माजी सैनिक असल्यास त्याने त्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यास माजी सैनिकांना अनुज्ञेय असलेले लाभ मिळणार नाही.

२१.३ माजी सैनिक उमेदवाराने विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील पद भरतीसाठी आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्ज केला असेल तर संबंधित प्रवर्गातील उमेदवारांप्रमाणे माजी सैनिकांना देखील उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२१.४ माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सैन्यात काम केल्याबाबतचे आवश्यक कागदपत्र व जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केले असल्याबाबत प्रमाणपत्र व सेवा तपशील दर्शविणारे अभिलेख प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

२१.५ तसेच निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्यांकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही.

२१.६ सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक आरटीए ९०९०/६२/प्र.क्र.२२२/९१/२८, दिनांक ३० डिसेंबर १९९१ आणि सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -२०१४/(प्र.क३६४/१४) /२८, दिनांक ०३/०६/२०१६ अन्वये माजी सैनिकांना शासन सेवेत नागरी सेवेतील पदावर नियुक्तीसाठी देण्यात येणाऱ्या सवलतीचा त्यांनी एकदा फायदा घेतल्यावर नागरी सेवेतील पदावर नेमणुकीसाठी दुसऱ्यांदा तसा फायदा घेता येणार नाही. तथापि राज्य शासनाच्या (तसेच राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सर्व महामंडळे, मंडळे, प्राधिकरणे, नगरपालिका, महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, कंपन्या, जिल्हा परिषदा, अन्य संस्था व इतर सर्व कार्यालये इत्यादी यामधील) नागरी सेवेत प्रथमतः रुजू होताना, त्यावेळी त्यांनी ज्या विविध पदांसाठी अर्ज केलेले आहेत, त्याबाबतची दिनांकनिहाय सविस्तर माहिती स्वतःच्या स्वाक्षरीने लेखा स्वयंघोषणापत्राच्या स्वरुपात संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यास दिला असल्यास नागरी सेवेतील पदावरील नेमणुकीसाठी दुसऱ्यांदा तसा फायदा घेता येईल. प्रथम नियुक्ती स्वीकारतांना माजी सैनिकाने जर स्वयंघोषणापत्र दिलेले नसेल तर शासन निर्णय दिनांक ३०/१२/१९९१ मधील तरतूदी लागू राहतील.

२१.७ सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक आरटीए १०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ, दिनांक ०२/०९/१९८३ अन्वये

अ)माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युद्ध काळात आणि युद्ध नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास असा माजी सैनिक १५ % राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहिल.

ब) युद्ध काळात किंवा युद्ध नसताना सैनिक सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला त्यानंतरच्या पसंतीक्रमाने १५ टक्के आरक्षित पदापैकी उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहिल.

तथापि, सदर उमेदवाराने पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

२१.८ माजी सैनिकासाठी आरक्षणाबाबत तरतुदी शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार असतील.

**२२. प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षण :-**

२२.१ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ, दिनांक २१ जानेवारी १९८० व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भुकंप/१००९/प्र.क्र. २७/२००९/१६ अ, दिनांक २७/०८/२००९, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : राआधो ४०२४/प्र.क्र.१४/१६-अ, दिनांक २५.०१.२०२४ नुसार प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षण लागु राहील.

गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी (संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी) यांचेकडील प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मूळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्यावेळी सादर करणे बंधनकारक राहील. निवड झालेल्या उमेदवारांचे प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणारे अधिकारी यांचे कार्यालयांकडून पडताळणी करून घेतले जाईल. सदर पडताळणी अंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**२३. भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण :-**

२३.१ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भूकंप-१००९/ प्र.क्र.२०७/ २००९/ १६-अ, दिनांक २७/०८/२००९ तसेच शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार भूकंपग्रस्ताचे आरक्षण राहील.

२३.२ उमेदवाराकडे जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ नुसार दिलेले प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील.

२३.३ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक विकाक २२१५/प्र.क्र.३३७/१६-अ, दिनांक ०४/११/२०१६ नूसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना तसेच भूकंपग्रस्तांना शासकीय सेवेतील गट-क व गट-ड पदावर नियुक्ती देणेबाबत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनूसार कार्यवाही करण्यात येईल. शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार भूकंपग्रस्ताचे आरक्षण राहील.

**२४. पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांच्याकरीता आरक्षण :-**

२४.१ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दिनांक २७/१०/२००९ नुसार या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी सुशिक्षित बेरोजगार या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षे काम केल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये सदर अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अंशका-१९१३/ प्र.क्र.५७/ २०१३/१६-अ, दिनांक १९/०९/२०१३ आणि सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पअंका-१९१३/प्र.क्र.१९८/१६-अ, दिनांक १०/१०/२०१३ तसेच शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांचेकरीता आरक्षण राहील.

२४.२ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अंशका-१९१३/ प्र.क्र.५७/ २०१३/१६-अ, दिनांक १९/०९/२०१३ नुसार जाहिरातीत दर्शविलेल्या आरक्षित पदांसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे गुणवत्तेनुसार उपलब्ध अन्य पात्र उमेदवारांमधून दिनांक १६.०३.१९९९ च्या शासन परिपत्रकातील तरतूदींनुसार विहित केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करून भरण्यात येतील.

२४.३ निवड झालेल्या पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना त्यांना रोजगार स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडून ३ वर्षाच्या अनुभवाबाबत मिळालेले मूळ प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळेला सादर करणे आवश्यक राहील.

**२५. टंकलेखन अर्हता धारण करण्यातून तात्पुरती सूट :-**

२५.१ माजी सैनिक वर्गातून अर्ज करण्यास पात्र असलेल्या उमेदवाराने विहित टंकलेखन अर्हता धारण केली नसेल अशा उमेदवारास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र. १८०/ २८, दिनांक १३/०६/२०१९ अन्वये त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे माजी सैनिक आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

२५.२ अनाथ उमेदवाराने विहित टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र धारण केलेले नसेल तर महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अनाथ -२०२२/प्र.क्र. ८४/ का-०३, दिनांक ०७/०७/२०२२ नुसार टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे अनाथ आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

**२६. अटी व शर्ती :-**

२६.१ या जाहिरातीमध्ये नमुद केलेली कनिष्ठ लेखापाल पदे लेखा व कोषागारे, गट-क या प्रादेशिक संवर्गातील आहेत. या संवर्गात नियुक्त झालेले कर्मचारी व सध्या अस्तित्वात असलेल्या संवर्गातील कर्मचारी यांच्या सेवाज्येष्ठता, विभागीय परीक्षा व अन्य सेवाविषयक बाबीसंबंधी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयातील तरतुदीनूसार बंधनकारक राहतील.

२६.२ शासकीय / निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांना लेखी पुर्वसुचित करुन भरावेत. अशा अर्जदारास नियुक्तीच्या वेळेस त्याच्या पूर्वीच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र / परवानगी पत्र सादर करणे बंधनकारक राहील.

२६.३ उमेदवाराने त्यास राखीव प्रवर्गाचा म्हणून विचारात घेण्याचा पर्याय स्विकारला आणि जर त्याने तो त्या प्रवर्गाचा असल्याबाबतची प्रमाणपत्रे सादर केली नाहीत तर त्याने चुकीची माहिती दिली म्हणून त्यास अपात्र ठरविण्यात येईल आणि त्याचा खुल्या प्रवर्गासाठीही विचार केला जाणार नाही.

२६.४ उमेदवारांनी अध्यक्ष, प्रादेशिक निवड समिती तथा सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग अमरावती या कार्यालयात उपरोक्त पदांसाठी केलेल्या अर्जासंदर्भात कोणतीही चौकशी / पत्रव्यवहार करु नये. अशी चौकशी/ पत्रव्यवहार कार्यालयामध्ये विचारात घेतला जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२६.५ उमेदवारांनी दिलेली माहिती खरी आहे असे समजून त्यांची पात्रता निर्धारित करण्यात येईल. जर एखाद्या उमेदवाराने दिलेली माहिती खोटी, सदोष अथवा चुकीची आहे असे कोणत्याही टप्प्यावर आढळून आल्यास अशा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

२६.६ एखाद्या अर्जदाराने त्यांची निवड करणेसाठी शासकीय अधिकाऱ्यावर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैर प्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.

२६.७ नव्याने नियुक्त होणाऱ्या उमेदवारास निवृत्तीवेतन विषयक लाभांबाबत वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ नुसार व वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४, दिनांक २७/०८/२०१४, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक रानियो-२०२२/प्र.क्र.३४/ सेवा, दिनांक ३१/०३/२०२३, वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांक रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४, दिनांक २०/०४/२०२३ व वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांक रानिप्र-२०२३/प्र.क्र.५७/सेवा-४, दिनांक ३०/०५/२०२४ नूसार लागू करण्यात आलेली नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (New Defined Contributory Pension Scheme)/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (National Pension Scheme) तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक सेनिवे-२०२४/प्र.क्र. ५४/सेवा ४, दिनांक २०/०९/२०२४ नुसार राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्य

शासनाची सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना तसेच केंद्र शासनाचे एकीकृत निवृत्तीवेतन योजना मधील तरतूदी लागू राहतील व शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय लागू राहतील.

२६.८ सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसुचना क्रमांक एसआरव्ही. २०००/ प्र.क्र. (१७/२०००)/ बारा, दिनांक २८/०३/२००५ अन्वये विहित महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार दिनांक २८.०३.२००५ रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या / हयात मुलांची संख्या एकूण २ पेक्षा जास्त असू नये.

२६.९ अंतिम निवड यादीतील पात्र उमेदवारांनी त्यांना कळविण्यात आलेल्या दिनांकास शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) तसेच जातीचा दाखला, उपलब्ध असल्यास जातवैधता प्रमाणपत्र, अ.ज./अ.जा.उमेदवार/ अर्जदार वगळून इतरांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसले बाबत (Non Creamy layer) इत्यादी प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती कागदपत्रे पडताळणीवेळी या कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील. अंतिम निवड यादीतील पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रती मुळ प्रमाणपत्राच्या आधारे तपासण्यात येतील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटे किंवा चुकीची अथवा अपूर्ण आढळल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

२६.१० महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ मधील तरतूदीनुसार उमेदवाराने नियुक्तीनंतर ६ महिन्याची सेवा पूर्ण होण्यापूर्वी नियमानुसार वैद्यकीयदृष्ट्या सक्षम / पात्र असल्याचे जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. उमेदवार वैद्यकीय दृष्ट्या सक्षम / पात्र नसल्याचे जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या तपासणीत निष्पन्न झाल्यास, त्याची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

२६.११ शासकीय सेवेत संबंधित उमेदवाराची नियुक्ती त्याच्या पूर्व चारित्र्य व वर्तणूक (पोलीस चौकशी) यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील व तसा तपासणी अहवाल आक्षेपार्ह असल्यास संबधित उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा प्रकरणी सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : चापअ १०१२/प्र.क्र.६३/१६-अ, दिनांक २६/०८/२०१४ नूसार गठीत केलेल्या समितीच्या निर्णयानुसार व परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल. तसेच तपासणी अहवाल प्राप्त होण्यापूर्वी संबंधित उमेदवारास नियुक्ती दिली असल्यास तपासणी अहवाल आक्षेपार्ह आढळल्यानंतर कोणतीही पूर्व सुचना न देता सेवेतून काढण्यात येईल.

२६.१२ माजी सैनिक असल्यास जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचेकडील माजी सैनिक असल्याबाबतचा दाखला व डिस्चार्जबुकची सांक्षाकित प्रत कागदपत्राच्या पडताळणी वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

२६.१३ अंशकालीन उमेदवारांनी सुशिक्षीत बेरोजगार अर्थसहाय्य या योजनेतंर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केल्याबाबतच्या प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत व रोजगार केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याबाबत सेवायोजन कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत कागदपत्र पडताळणी वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

२६.१४ खेळाडूंनी गट-क संवर्गातील पदावर नियुक्तीसाठी क्रिडा विषयक अर्हता प्रमाणपत्र संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. ते प्रमाणपत्र विधीग्राह्य नसल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची नियुक्ती कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल.

२६.१५ प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त उमेदवारांनी त्याबाबतच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राची मूळ कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

२६.१६ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवाराच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याबाबतची नोंद घ्यावी.

२६.१७ काही अपरिहार्य कारणास्तव ऑनलाईन परीक्षेच्या तारखांमध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती **https://mahakosh.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

२६.१८ निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती /कागदपत्रे खोटी सादर केल्याची किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवाराची उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल. अर्जात नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास संबंधित उमेदवार कारवाईस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील.

२६.१९ दैनंदिन शासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर बंधनकारक असल्याने मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे. माध्यमिक शालांत परीक्षेत मराठी आणि हिंदी विषयाचा समावेश नसल्यास निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मराठी आणि हिंदी भाषा परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे बंधनकारक राहिल.

२६.२० भरती प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये.

२६.२१ निवड प्रक्रियेत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार अध्यक्ष प्रादेशिक निवड समिती तथा सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती यांना असतील. सदर भरती प्रक्रिया ही अमरावती या जिल्हयाच्या संबंधित न्यायालयाच्या न्यायाधिकार कक्षेत असेल.

२६.२२ जाहिरातीमधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णयातील तरतुदी अंतिम राहतील.

२६.२३ सदर पदभरती नियम/ निकषामध्ये पदभरती पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णय/ शासन शुद्धीपत्रक/ शासन अधिसूचना यानुसार बदल होऊ शकतो.

२६.२४ वरील अटी व शर्ती व्यतिरिक्त शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.

## २७. निवडसूचीची कालमर्यादा :-

२७.१ निवड समितीने तयार केलेली निवडसुची १ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील. त्यांनतर ही निवडसूची व्यपगत होईल. भरती प्रक्रियेदरम्यान महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने भरती प्रक्रिया, निवड सूची इत्यादी अनुषंगाने दिलेले निर्देश तथा सूचना किंवा सुधारणा यथास्थितीत लागू राहतील.

२७.२ निवड समितीने तयार केलेल्या निवडसूचीमधून ज्येष्ठतेनुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर विहित मुदतीत रुजू न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार, किंवा जात प्रमाणपत्र / अन्य आवश्यक प्रमाणपत्रांची अनुपलब्धता / अवैधता किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास अथवा शिफारस केलेला उमेदवार रुजू झाल्यानंतर नजिकच्या कालावधीत त्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा त्याचा मृत्यू झाल्याने पद रिक्त झाल्यास, अशी पदे त्या त्या प्रवर्गाच्या निवडसूचीतील प्रतिक्षा यादीतील उमेदवारांमधून निवडसूचीच्या कालमर्यादेत वरिष्ठतेनुसार उतरत्या क्रमाने भरण्यात येतील. मात्र, अशी कार्यवाही निवडसूचीच्या कालमर्यादेत करण्यात येईल.

## २८. अयोग्य वर्तन / अयोग्य माध्यमांचा वापर केल्याबद्दल दोषी आढळलेल्या उमेदवारांविरुद्ध कार्यवाही :-

उमेदवारांना सूचित केले जाते की, त्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करतांना कोणतेही खोटे, छेडछाड केलेले किंवा बनावट तपशील सादर करु नये आणि कोणतीही महत्वाची माहिती लपवू नये. परीक्षेच्या वेळी किंवा त्यानंतरच्या निवड प्रक्रियेत उमेदवार खालील बाबतीत दोषी असल्यास किंवा आढळून आल्यास असा उमेदवार त्या विरुद्ध खटला भरणे यासोबतच ज्या परीक्षेसाठी तो उमेदवार आहे, त्या परीक्षेसाठी अपात्र ठरवणे, विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी कायम स्वरुपी किंवा विशिष्ट कालावधीसाठी अपात्र ठरवणे किंवा त्याच्या सेवा समाप्त करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

i. अयोग्य मार्गाचा अवलंब करणे.
ii. तोतयागिरी करणे किंवा कोणत्याही व्यक्तीव्दारे तोतयागिरी करुन घेणे.
iii. परीक्षा हॉलमध्ये गैरवर्तन करणे किंवा चाचणीची सामग्री किंवा त्यातील इतर कोणतीही माहिती कोणत्याही स्वरुपात तोंडी किंवा लेखी, इलेक्ट्रॉनिक किंवा यांत्रिकरीत्या कोणत्याही उद्देशाने उघड

करणे, प्रकाशित करणे, पुनरुत्पादन करणे, प्रसारित करणे, संग्रहित करणे किंवा प्रसारीत करण्यासाठी सुलभ करणे.

iv. त्याच्या / तिच्या उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही अनियमित किंवा अयोग्य मार्गाचा अवलंब करणे किंवा

v. अयोग्य मार्गाने त्याच्या किंवा तिच्या उमेदवारीसाठी समर्थन मिळविणे किंवा परीक्षा हॉलमध्ये मोबाईल फोन किंवा संवादाची तत्सम इलेक्ट्रॉनिक उपकरणे बाळगणे.

**२९ कागदपत्रे पडताळणी वेळेस विहित कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करणे :-**

सदर परिक्षेच्या निकालानंतर तात्पुरत्या निवडयादीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीकरिता बोलावण्यात येईल. कागदपत्र पडताळणीच्या वेळेस उमेदवारांना लागू असणारी खालील नमूद कागदपत्रे/ प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती व छायांकित प्रती सादर करणे बंधनकारक राहिल

| अ.क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| १ | परीक्षेसाठी केलेल्या ऑनलाईन आवेदन पत्राची छायांकित प्रत. |
| २ | परीक्षेच्या प्रवेशपत्राची छायांकित प्रत. |
| ३ | परीक्षा शुल्क भरणा केलेल्या पावतीची प्रत. |
| ४ | एस.एस.सी अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता. |
| ५ | वयाचा पुरावा. |
| ६ | जन्माचा पुरावा |
| ७ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा. |
| ८ | टंकलेखन प्रमाणपत्र |
| ९ | MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र |
| १० | राखीव प्रवर्गातील उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र |
| ११ | आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक असल्याचा पुरावा. |
| १२ | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र. |
| १३ | माजी सैनिक / दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा. |
| १४ | खेळाडू /अनाथ /प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्त /अंशकालीन पदवीधर यापैकी आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा. |
| १५ | विवाहीत स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा. |
| १६ | महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र |
| १७ | महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला |
| १८ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा. |
| १९ | लहान कुटंबाचे प्रमाणपत्र. |
| २० | आत्महत्याग्रस्त शेतक-याचे पाल्य असल्याचा पुरावा |
| २१ | अ) स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असल्याचा पुरावा<br>ब) १९९१ चे जनगणना कर्मचारी असल्याचा पुरावा<br>क) १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी असल्याचा पुरावा |

**https://mahakosh.maharashtra.gov.in** संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात अधिकृत समजण्यात यावी.

ठिकाण :- अमरावती

दिनांक : - २६.०१.२०२५

स्वा/-
अध्यक्ष
प्रादेशिक निवड समिती तथा
सहसंचालक, लेखा व कोषागारे,
अमरावती विभाग, अमरावती

**About Normalization:**

Normalization means adjusting values measured on different scales to a notionally common scale.

**Need for Normalization in Exam:**

Exam pertaining for a particular post/course could be spread across multiple shifts which will have different question paper for each shift. The normalization is to be done by considering the difficulty level of each set, since the questions may be different in different sets and difficulty level of a particular set may be different from other sets. Hence the normalization of scores needs to be carried out for all the candidates who had written the exam, across shifts for the same post/course.

## Mean Standard Deviation Method

$$\widehat{M}_{ij} = \frac{\overline{M}_t^g - M_q^g}{\overline{M}_{ti} - M_{iq}} \left(M_{ij} - M_{iq}\right) + M_q^{gm}$$

$\widehat{M}_{ij}$ = Normalized marks of j[th] candidate in the i[th] shift.

$\overline{M}_t^g$ = is the average marks of the top 0.1% of the candidates considering all shifts (No. of candidates will be rounded-up)

$M_q^g$ = is the sum of mean and standard deviation marks of the candidates in the paper considering all shifts.

$\overline{M}_{ti}$ = is the average marks of the top 0.1% of the candidates in the i[th] shift (No. of candidates will be rounded-up)

$M_{iq}$ = is the sum of mean marks and standard deviation of the i[th] shift

$M_{ij}$ = is the actual marks obtained by the j[th] candidate in i[th] shift.

$M_q^{gm}$ = is the sum of mean marks of candidates in the shift having maximum mean and standard deviation of marks of candidates in the examination considering all shifts.

**Note:**

1. Calculation of marks will be done up to 5 decimal places.
2. Normalization of scores ensures that the marks accurately reflect the candidates' performance relative to the difficulty of the exam in every Shift. The mathematical process of normalization leads to increase or decrease of marks beyond the maximum or minimum marks. These scores are therefore capped at maximum and minimum marks. However, the selection list and the waiting list is computed based on the actual normalized score.